॥ सा विद्या या विमुक्तये ॥

# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

'ज्ञानतीर्थ', विष्णुपुरी, नांदेड - ४३१ ६०६ (महाराष्ट्र राज्य) भारत

SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED

'Dnyanteerth', Vishnupuri, Nanded - 431 606 (Maharashtra State) INDIA

Established on 17th September, 1994, Recognized By the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with'B++' grade

Fax : (02462) 215572 **NATIONAL SERVICE SCHEME DEPARTMENT** website: srtmun.ac.in

Phone: (02462) 215246 E-mail: nss@srtmun.ac.in

जा.क्र. : रासेयो/२०२३—२४/६१९ दिनांक ११/०३/२०२४

**परिपत्रक**

**प्रति,**
**मा.प्राचार्य/रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी,**
**रा.से.यो. राबविणारी सर्व संलग्नीत महाविद्यालये,**
**प्रस्तुत विद्यापीठ.**

**विषय: पब्लिक फायन्नाशियल मॅनेजमेंट PFMS सिस्टीम प्रणाली संदर्भात प्रशिक्षण आयोजित करणे बाबत.**

**संदर्भ:** १) मा. निलेश पाठक, राज्यसंपर्क अधिकारी व विशेष कार्य अधिकारी, रा.से.यो.मंत्रालय कक्ष,मुंबई यांचे जा.क्र. रासेयो—२०२२/प्र.क्र.१५५/रासेयो कक्ष दिनांक ०७ मार्च २०२४

२) मा. डॉ. अजय शिंदे, रा.से.यो क्षेत्रीय संचालक, पुणे यांचे F.No. 13/13/NSS/RD Pune/ 2023-24/1267-1300 Date 07th March 2024

महोदय,

उपरोक्त विषयी संदर्भिय पत्रान्वये मा. राज्यसंपर्क अधिकारी व विशेष कार्य अधिकारी, रा.से.यो. मंत्रालय कक्ष, मुंबई यांनी व मा. डॉ. अजय शिंदे, रा.से.यो क्षेत्रीय संचालक, पुणे यांनी मा.संचालक रा.से.यो. युवक कल्याण व क्रिडा मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या निर्देशान्वये रा.से.यो. केंद्र हिस्सा योजनेतंर्गत सहाय्यक अनुदान निधी वितरण PFMS प्रणालीद्वारे करण्यात येते. सदर निधी सर्व अनुदानित विद्यापीठे यांना PFMS सेंट्रल नोडल अकाऊंट (C.N.A.) द्वारे वितरीत करण्यात येतो. वितरीत झालेला निधी रासेयो एककांना संस्थात्मक स्तरावर PFMS प्रणाली मध्ये जाऊन बुक करावा लागतो. या सर्व प्रक्रियेसाठी सर्व रासेयो विद्यापीठाचे कार्यक्रम समन्वयक तथा संचालक तसेच महाविद्यालयांचे कार्यक्रम अधिकारी यांना PFMS प्रणाली अवगत होणे क्रमप्राप्त आहे. आजतागायत बहुतांश विद्यापीठे व एकक महाविद्यालयांचे कार्यक्रम समन्वयक तथा संचालक व कार्यक्रम अधिकारी यांना PFMS प्रणाली हाताळणी करीत असतांना असंख्य अडचणीचा सामना करावा लागत असल्याने दिनांक १० ते १६ मार्च २०२४ या कालावधीत रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी यांच्यासाठी PFMS प्रणाली बाबतचे प्रशिक्षण आयोजित करण्यास कळविले आहे.

त्या अनुषंगाने रा.से.यो. संलग्नीत सर्व महाविद्यालयांना सुचित करण्यात येते की, गुरूवार दिनांक १४/०३/२०२४ रोजी सकाळी ठीक ११:३० वाजता रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी यांच्यासाठी PFMS प्रणाली बाबतचे प्रशिक्षण मा. अधिसभा सभागृहात आयोजित करण्यात आले आहे. तरी सर्वांनी सदरील कार्यशाळेस उपस्थित राहणे बंधनकारक आहे. कारण ३१ मार्च रोजी अनुदानाची रक्कम झीरो (०) होणार आहे आणि पुन्हा नंतर अनुदानाची रक्कम मिळणार नाही कारण यानंतरची सर्व जबाबदारी संबधित महाविद्यालयाची राहील याची गांभीर्याने नोंद घ्यावी, ही विनंती.

**डॉ.मल्लिकार्जुन करजगी**
**संचालक**
राष्ट्रीय सेवा योजना विभाग

प्रत माहितीस्तव:
१) मा. कुलगुरू महोदयांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
२) मा. कुलसचिवांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
३) मा.जनसंपर्क अधिकारी, जनसंपर्क कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.

प्रत माहिती तथा कार्यवाहिस्तव:
१) सिस्टीम एक्सपर्ट, संगणक कक्ष, प्रस्तुत विद्यापीठ, यांना प्रत देवून कळविण्यात येते की, सदरील परिपत्रक विद्यापीठाच्या व रा.से.यो विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावे, ही विनंती.